**MHBH090013102022**

**संक्षिप्त फौ.प्र.क्र.799/2022**
**राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, भंडारा –वि. – दुर्गाप्रसाद**
(निशाणी 05 खाली)

## न्यायनिर्णय

(पारित दिनांक 4 डिसेंबर, 2023)

1. सदरचे प्रकरण आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम 65(फ) च्या गुन्ह्याकरिता चालविण्यात आले. अभियोगपक्षातर्फे सरकारी विधीज्ञ श्रीमती पी.बी. नवनागे व आरोपीकरिता विधीज्ञ श्री. के.बी. वासनिक यांना ऐकले. अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रे व पुराव्याच्या आधारे न्यायालयाच्या विचारार्थ निघालेले प्रश्न व त्यावर माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे दिले आहे.

| | **विचारार्थ प्रश्न** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| 1 | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक 19/08/2022 रोजी 11.30 वाजताचे दरम्यान मौजा हिरापूर/हमेशा गावाच्या नाल्याच्या काठावर सरकारी जागेत आरोपीच्या ताब्यात 05 प्लॉस्टीक ड्रममध्ये 1000 किलो मोहापास सडवा मिळुन आला व त्याद्वारे आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम 65(फ) प्रमाणे गुन्हा केला ? | | ........नाही. |
| 2 | आदेश काय ? | | ... आरोपीला दोषमुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

2. आरोपीविरुध्द आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने केशोराव रामचंद्र गौपाले (अ.सा.क्र.1) यांची साक्ष नोंदविली. त्यानंतर निशाणी क्र.1 वर आदेश करून अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीने त्याचे बचावात स्वतःची किंवा इतर व्यक्तीची साक्ष नोंदविली नाही.

**विचारार्थ प्रश्न क्र. 1 बाबत** :–

3. आरोपाला अनुसरुन अभियोग पक्षाने महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम 65(फ) प्रमाणे आरोपीने विना परवाना अवैधरित्या मोहाफुल सडवा बाळगला, हे सिध्द करणे बंधनकारक आहे.

4. पंच साक्षदार केशोराव (अ.सा.क्र.1) याने त्याचे साक्षेत कथन केले की, पोलीसांनी त्याला पंचनामासाठी कुठेही बोलविले नाही. त्याचे समक्ष पोलीसांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. पोलीसांनी त्याच्या समक्ष काहीही जप्त केले नाही. पोलीसांनी त्याची सही गावातील चौकामध्ये घेतली. घटनास्थळ, जप्ती पंचनामा आणि रिकाम्या बाटलीचा पंचाम्यावर त्याची सही असून त्यातील मजकूर बरोबर नाही. सरकारी अधिवक्त्याने साक्षदारास उलटतपासामध्ये विचारता येण्यासारखे प्रश्न विचारले असता त्यामधुन अभियोग पक्षास उपयुक्त होईल असे काहीही निष्पन्न झाले नाही.

5. अभिलेखाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये रासायनिक विश्लेषणाचा अहवाल अभिलेखावर दिसून येतो. रासायनिक विश्लेषण अहवालाचे अवलोकन केले असता, नमुन्यामध्ये 4.02 टक्के इथेल अल्कोहोल आढळुन आले. सदर अहवालातील मजकुर हा पुरावा म्हणून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम 293 प्रमाणे वाचता येतो. त्या अहवालाकरिता विशेष साक्षीदार तपासण्याची आवश्यकता नाही. परंतु, अभियोगपक्षाने घेतलेल्या नमुन्याबाबत व नमुना रासायनिक विश्लेषणाकरिता पाठविण्यासंबंधी घालून दिलेल्या पध्दतीबाबत तोंडी साक्ष देणे आवश्यक आहे. अभियोग पक्षाने त्यासंबंधी नमुना कोणी, कुठे व कसा घेतला, तसेच त्या नमुन्याला सुरक्षित ठेवण्यासाठी कुठली उपाययोजनेचा अवलंब केला, याबाबत अभिलेखात पुरावा उपलब्ध नाही. घटनास्थळावर घेतलेला नमुना, रासायनिक विश्लेषणाकरिता पाठविलेला नमुना व रासायनिक विश्लेषणाच्या अहवालामध्ये नमुना हा एकच असल्यासंबंधी अभिलेखावर तोंडी पुरावा उपलब्ध नाही. जप्त मुद्देमालाचे नमुने घेण्याच्या प्रक्रियेबाबत कोणत्याही साक्षीदाराचा साक्षपुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे सुध्दा विहीत प्रक्रियेनुसार नमुने घेण्यात आले होते किंवा नाही, याबाबत शंका निर्माण होते. सदर बाबींच्या अभावामध्ये रासायनिक विश्लेषण अहवालाला विशेष महत्त्व प्राप्त होत नाही. तो गुन्ह्याचा एकमेव पुरावा म्हणून ग्राह्य धरता येणार नाही. तसेच आरोपीचा दोष सिध्द करण्यासाठी सदरचा रासायनिक विश्लेषण

अहवाल पुरेसा नाही. त्याचबरोबर गुन्ह्यातील मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आला होता ही बाब दर्शविण्यासाठी कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर नाही. एकंदरित, वरील विवेचनावरून अभियोगपक्षाने महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम 65(फ) प्रमाणे आरोपीने विना परवाना अवैधरित्या मोहादारू बाळगली, असे सिध्द केलेले नाही. सबब विचारार्थ प्रश्न क्र.1 ला नकारार्थी उत्तर देत असून विचारार्थ प्रश्न क्र.2 ला उत्तर म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

1. आरोपी दुर्गाप्रसाद धाडू गहाने याला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 258 अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायदाचे कलम 65 (फ) अन्वये अपराधाच्या आरोपातून दोषमुक्त करण्यात येते.
2. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.
3. ईतर जप्त मुद्देमाल असल्यास अपीलाचा कालावधी संपल्यानंतर कायद्यातील तरतुदीनुसार विल्हेवाट लावण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

स्वा/-
( के.पी. दवने )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
तुमसर.

दि.04/12/2023.